# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/238/२०२५ दि. ११ /१०/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **नौपाडा** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. १३/१०/२०२५ रोजी शिवसेना ( उध्दव बाळासाहेब ठाकरे ) तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांचा **संयुक्त मोर्चा** आयोजीत केलेला आहे. सदर मोर्चाचे वेळी बहुसंख्य कार्यकर्ते/पदाधिकारी तसेच स्थानिक नागरिक मोर्चात मोठया प्रमाणात सहभागी होवून गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये व सदर परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद** – | १) डॉ. मुस चौका कडुन गडकरी सर्कलच्या दिशेने येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **मुस चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग** – | सदरची वाहने डॉ. मुस चौकातून सरळ–टॉवर नाका–टेंभी नाका–मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद** – | २) गडकरी सर्कलकडुन डॉ. मुस चौकाच्या दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **गडकरी सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग** – | सदरची वाहने गडकरी सर्कल येथून–अल्मेडा चौक–चरई कट–खोपट बस सिग्नल मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद** – | ३) गोखले रोड सत्यम कलेक्शन मार्गे सगुना फार्म दिशेने येणाऱ्या वाहनांना **क्वीनस् कॉर्नर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग** – | सदरची वाहने क्वीनस् कॉर्नरवरून उजवीकडे गोखले उपहार गृह मार्गे–गोखले रोडवर अथवा विष्णुनगर कट नौपाडा पोलीस स्टेशन मार्गे इच्छित स्थळी जातील |
| **प्रवेश बंद** – | ४) गणपती कारखाना मार्गे पुरणपोळी दिशेला येणा–या तसेच पु.ना. गाडगीळ चौकातुन पुरण पोळी दिशेने येणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **पुरणपोळी चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग** – | सदरची वाहने गणपती कारखाना येथे उजवे वळण घेवुन विष्णुनगर कट नौपाडा पोलीस स्टेशन मार्गे तसेच पु.ना. गाडगीळ चौकातुन पुरण पोळी दिशेने येणा–या सर्व प्रकारची वाहने पु.ना.गाडगीळ चौक येथुन गजानन महाराज चौक पुढे अल्मेडा खोपट मार्गे इच्छितस्थळी जातील |
| **प्रवेश बंद** – | ५) राजमाता वडापाव सेंटरकडुन मढवी हाउस दिशेने येणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **मढवी हाउस** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग** – | सदरची वाहने राजमाता वडापाव सेंटर येथुन गावदेवी मार्केट कर्वे रोड मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद** – | ६) विष्णुनगर कट मार्गे गजानन वडापाव दिशेने येणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **विष्णुनगर कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग** – | सदरची वाहने विष्णुनगर कट नौपाडा पोलीस स्टेशन मार्गे इच्छित स्थळी जातील |
| **प्रवेश बंद** – | ७) गजानन वडापाव तसेच श्रध्दा वडापाव मार्गे गणपती कारखाना येथुन आराधना दिशेने येणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **गणपती कारखाना चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग** – | सदरची वाहने गणपती कारखाना येथुन गजानन वडापाव मार्गे विष्णुनगर कट नौपाडा पोलीस स्टेशन दिशेने इच्छित स्थळी जातील |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| प्रवेश बंद – | ८) हरिनिवास सर्कल मार्गे आराधना दिशेने येणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना आराधना कट येथुन मोर्चा पुढे जाई पर्यंत **हरिनिवास सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| पर्यायी मार्ग – | सदरची वाहने हरिनिवास सर्कल घडयाळ चौक तंबी हॉटेल सत्ररंज वेफर्स पासुन पुढे सरळ इच्छित स्थळी जातील |
| प्रवेश बंद – | ९)घडयाळ चौक–डॉमीनोज–तंबी हॉटेल मार्गे टेकडी बंगला दिशेने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **तंबी हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| पर्यायी मार्ग – | सदरची वाहने तंबी हॉटेल येथुनच घडयाळ चौक येथुन उजवे वळण घेवुन एस.बी.आय.बॅक अथवा सत्ररंज वेफर्सच्या बाजुने सरळ पुढे तीन हात नाका मार्गे इच्छित स्थिळी जातील. |
| प्रवेश बंद – | १०) तंबी हॉटेल–प्रशांत कॉर्नर तसेच धर्मविर कट येथुन टिएमसी कडे येणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **परमार्थ निकेतन** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| पर्यायी मार्ग – | सदरची वाहने परमार्थ निकेतन येथुनच सत्ररंज वेफर्स अथवा धर्मविर कट मार्ग तीन हात नाका दिशेने इच्छित स्थळी जातील |
| प्रवेश बंद – | ११) अल्मेडा सिग्नल तसेच टेकडी बंगला रायगड गल्ली मार्गे टिएमसी सर्कल दिशेने येणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **चंदनवाडी कट शिवसेना शाखा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| पर्यायी मार्ग – | सदरची वाहने अल्मेडा सिग्नलवरून चरई कट खोपट मार्गे इच्छित स्थळी जातील |
| प्रवेश बंद – | १२) नुरीबाबत दर्गा चंदनवाडी मार्गे टिएमसी दिशेने येणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **टिएमसी सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| पर्यायी मार्ग – | सदरची वाहने नुरीबाबा दर्गा–चरई कट खोपट सिग्नल मार्गे इच्छित स्थळी जातील |

टिप– **सदर मोर्चा मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना नो पार्किंग करण्यात येत आहे.**

सदरची अधिसुचना दि. १३/१०/२०२५ रोजी दुपारी १४.०० वा ते २१.०० वा. पावेतो अंमलात राहील. सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागु राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त
वाहतुक विभाग, ठाणे शहर

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/–सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगर पालीका, ठाणे
**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे/ मिरा– भाईदर, वसई– विरार ,बी.ई.एस.टी., नवी मुंबई
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे / नवी मुंबई
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१,ठाणे व ५ वागळे इस्टेट/विशेष शाखा, ठाणे

Scanned with OKEN Scanner

प्रतः— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर

२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे.

२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत :— सपोआ ठाणे/वागळे वाहतुक विभाग/सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी वाहतुक उपविभाग.**

२/— म.न.पा.ठाणे च्या संबधीत अधिकाऱ्याकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

Scanned with OKEN Scanner